मध्ययुगीन औरंगाबाद शहराचे ऐतिहासिक महत्त्व

डॉ. गनी पटेल
खुल्ताबाद

आशिया खंडातील अतिशय कमी कालावधीत विकसित होत असलेले शहर औरंगाबाद हे भारतातील महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक, शैक्षणिक, पर्यटनात्मक तथा ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण असे शहर आहे. मध्ययुगाच्या काळातील एक छोटे शहर खडकी होते आज आपण याला औरंगाबाद म्हणुन ओळखतो. "जेव्हा निझामशाहीची राजधानी अहमदनगर होती. तेव्हा अहमदनगरचा मुर्तझा निझामशहा यांच्या आदेशानुसार वझीर मलिक अंबर याने इ.स. १६१० मध्ये आपली राजधानी अहमदनगर ऐवजी, खडकी केली."[१] खडकी या शहराचा अभ्यास करुन मलिक अंबरने या शहराला खरे रुप दिले. मुगलांच्या काळात औरंगजेबाने या शहराचे विस्ताराचे काम हाती घेतले. पुढे औरंगजेबाच्या नावावरुन 'औरंगाबाद' संबोधण्यात आले.

दख्खनचा ताज म्हणून ओळखला जाणारा बिबी का मकबरा, नहरी, विविध मस्जिदी, मोठ्या प्रमाणावर प्रवेशद्वार व तटबंदी अशा अनेक ऐतिहासिक वास्तु या शहरात आहेत. त्या दृष्टिकोनातून या शहराकडे पर्यटक आकर्षित होतांना दिसून येतात. ऐतिहासिक संशोधनासाठी, अभ्यासू पर्यटकांसाठी औरंगाबाद शहरी अतिशय महत्त्वपूर्ण आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या औरंगाबाद शहराला साधारणपणे ४०० वर्षांचा इतिहास आहे. या ऐतिहासिक बाबींचा संशोधनात्मक विचार होणे आवश्यक आहे. पर्यटनात्मक, सौंदर्यात्मक व ऐतिहासिक या तिन्ही बाबींचा एकत्रितपणे विकास घडून आणण्यासाठी या शहराकडे पाहणे गरजेचे आहे त्या दृष्टिकोनातून संशोधनासाठी अशा प्रकारचा विषय हाताळणे क्रमप्राप्त आहे.

शहराला ५२ दरवाज्यांचे व ५२ पुऱ्यांचे शहर म्हणुन ओळखले जाते. मात्र ते कितपत खरे आहे. हा संशोधनाचा विषय आहे. शहरातील विविध प्रवेशद्वारे व त्यांना लागून असलेली तटबंदी इतिहासाची साक्ष देतात. तसेच त्यांचे महत्त्व, त्यांची बाधकाम शैली, त्यांचा बांधण्यामागील उद्देश आणि व्याप्ती लक्षात येते. अशा दृष्टिकोनातुन संशोधनात्मकरित्या या संदर्भातील विषय हाताळणे आवश्यक आहे, असे जाणवले. त्या अनुषंगाने एक संशोधक म्हणुन "मध्ययुगीन औरंगाबाद शहरातील प्रवेशद्वार आणि तटबंदी : एक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी घेण्यात आला.

ऐतिहासिक औरंगाबाद शहराची भौगोलिक रचना

मलिक अंबरने औरंगाबाद परिसरातील भौगोलिक रचनेचा विचार करुन येथे विकासात्मक बाबींकडे लक्ष दिले. खाम नदी, दुधना व्हॅली, खडक या सगळ्यांचा विचार करुनच त्याने या परिसराची निवड केली असावी असे दिसून येते.

खाम नदी : औरंगाबाद हे संपूर्ण शहर खडकाळ भागावर असून एका छोट्या खाम नदीच्या आजुबाजुस पसरले आहे. खाम नदीमुळे तेथील आजुबाजुचा परिसर मध्ययुगाच्या काळात हिरवागार असत असे. "खाम नदी ही खडका-खडकातुन जोरजोरात वाहत असल्यामुळे वाहता पाण्याचा फेस दिसत असे. म्हणून या नदीला मिल्की नदी (Milky River) असे देखील म्हटले जात असे"[२] खाम नदी ही दक्षिणेकडे वाहत-वाहत पुर्व-पश्चिम दिशेकडे विभागणी होऊन पुन्हा गिरजा नदीस मिळते. औरंगाबाद शहरातून वाहत जाऊन पुढे

ती शेवटी गोदावरी नदीस मिळते.

दुधना व्हॅली : खाम नदी ही मुख्यत्त्वे दुधना व्हॅलीस सामावलेले आहे. उत्तरेकडे लेकनवारा रेंज ते दक्षिणेकडे सातारा टेकडी या परिसरापर्यंत दुधना व्हॅली मुळे हा परिसर निसर्गरम्य हिरवागार आहे. "दुधना व्हॅलीच्या व खाम नदीच्या खळखळत्या पाण्यामुळे, पाणी हे दुधासारखे फेसाळ दिसते. म्हणून तिला Milky Valley (मिल्की व्हॅली) म्हणतात. दुधना व्हॅली पुर्व-पश्चिम पसरते आणि गोलाकार बाकर (Curve) घेऊन शहरातून निघते."[३] दुधना ही पुर्णानदीची उपनदी असून ती कणकोरा गावापासून उगम पावते. उत्तरेकडे वाहत जाऊन परभणी जिल्ह्यात पुन्हा पुर्णा नदीस जाऊन मिळते. दुधनाचीच उपनदी सुखना औरंगाबादच्या उत्तरेकडून वाहत जाऊन पुर्णा नदीस मिळते.

औरंगाबाद शहराच्या उत्तरेस सह्याद्रीच्या डोंगर रांगांमध्ये गुफा असुन साधारणत: २५०० फुट उंचीवर आहेत. दुधना व्हॅलीच्या उत्तरेकडे जटवाडा, इस्लामपूर, ओहर, नायगाव, मोलदरी, भिडला आणि पुर्वेकडे चौका, साताळा, कणकोरा आणि सावंगी ही गावे आहे. तसेच मांडकी, कृष्णापुर, गंडकी, नारेगाव, पिसादेवी, ब्रीजवाडी ते चिकलठाणा, मजनु बुरुज ही सामान्यपणे दुधना व्हॅलीचा (Dudhana River Valley) परिसर आहे.

खडक : औरंगाबाद शहराचा परिसर हा मुख्यत: खडकाळ डोंगर असुन बेसॉल्ट खडकाचा आहे. (Basaltic lava) त्यावरुन या परिसरात मोठ्या प्रमाणात भुकंप झाले असावेत आणि मोठ्या प्रमाणावर शिलारस बाहेर निघाला असावा. हा परिसर साधारणत: २०,००,००० चौ. मैल एवढ्या प्रमाणात असावा.

खडक-खडकी : भौगोलिक पद्धतीने हा संपूर्ण प्रदेश खडकाळ आहे आणि औरंगाबाद शहर हे खडकावर वसलेले शहर आहे. शहर ज्या खडकावर वसलेलं आहे, त्यालाच आपण खडकी म्हणतो. "खडकावरुन ह्या शहराचे नाव खडकी संबोधले आहे."[४] "हा खडकी परिसर म्हणजे खडकाळ अशी जागा जी की, अनेक दगडावर, खडकावर थर असलेली जागा होय."[५] यावरून औरंगाबाद शहरास 'खडकी' या नावाने ओळखतात.

ऐतिहासिक औरंगाबाद : "४ फेब्रुवारी १६१६ मध्ये मलिक अंबर याने खडकी शहराला विकासाकडे नेण्याची सार्वंगीकदृष्ट्या परिपूर्णतिकडे नेण्याकडे लक्ष दिले. अशा प्रकारची योजना इतिहासात सर्वप्रथम राबविण्याचे आयोजन सुरु केले."[६] "तसेच शिव गुरुलिलामृत महादेवनाथ चरित्र त्यामध्ये खडकी हे एक छोटे गाव होते."[६] जे औरंगजेब अलमगीर याने ते विकसित करुन राजधानीचे शहर निर्माण केले.

खडकी-खडकेश्वर-औरंगाबाद : निझामशाहीचा वझीर मलिक अंबर ने आपली राजधानी बदलुन खडकी येथे केली. आजचे तेच एक सुप्रसिद्ध व ऐतिहासिक औरंगाबाद होय. "१७ व्या शतकाच्या सुरुवातीस त्यालाच प्राचीन (जुने) खडक किंवा राजतगड (Rajatgad), इतिहासाच्या सुरुवातीस ह्याच छोट्या शहराला (Rajatgad) राजतगड म्हटले जायचे."[८] त्यालाच (King's Lake) असेही म्हणतात.

मलिक अंबरने खडकी शहर जवळपास ६ वर्षात विकसित केले. त्याने "नवखंडा, जनाना इमारत, दिवाण-इ-खास, दिवाण-इ-आम, काला चबुतरा, भडकल गेट, काही प्रमाणात तटबंदी प्रवेशद्वार, जमिनी अंतर्गत पाण्याची नहर, चर्च

अशा अनेक वास्तु निर्माण केल्या''[९] ''जेव्हा मुघल सरदार शहानवाज खान याने मलिक अंबरला पैठण गोदावरी नदीजवळ पराभूत केले आणि येथील प्रदेश मुघलांच्या ताब्यात गेला''[१०] मुघल शहनवाज खान दख्खन कडुन येथे आला. त्याच्या लक्षात आले की, मलिक अंबर ने ५ वर्षात खडकी शहराचा पाया रोवला. पुन्हा शहानवाज खान ने ते काम पूर्ण करण्याचे, एक सुंदर शहर निर्माण करण्याचे ठरविले.

मलिक अंबरने उत्कृष्ट कारागीर व कामगार घेऊन २० वर्षात हे काम पूर्ण करून खडकी शहर विकसीत केले. ''जमिनी अंतर्गत असलेली पाणी पुरवठा पद्धत (नहर अंबरी) सन १६२४ मध्ये पूर्ण केली. आणि त्या पाण्याचा सर्वसाधारण, सामान्य लोकांना फायदा करून दिला. तसेच बाजार, नहर-इ-अंबर, रस्ते, विविध इमारती, बगीचे आणि तटबंदी या सर्व काही बाबी विकसीत केल्या.''[११]

''मध्ययुगाच्या सुरुवातीस या शहराला 'खडकी' आणि 'राजतगड' (Rajatgad) म्हणुन संबोधले गेले. म्हणून खडकी-औरंगाबाद हे नाव मध्ययुगीन काळातील आहे.''[१२] १७ व्या शतकाच्या सुरुवातीस त्याचे जुने नाव 'खटक' (Kataka) किंवा राजतगड आहे Kataka हे नाव हा शब्द संस्कृत भाषेतील आहे. त्याचा अर्थ राजधानी असा होता. त्यालाच आपण आर्मी कॅम्प (Army Camp) (लष्करी ठिकाण/छावणी) असेही म्हणतो. त्याच बरोबर Kataka चा दुसरा संबोधन 'Copper plates of Vallava' असाही आहे. राणी चारुदेवी नाशिक येथे ह्या बाबत पुरावे सापडले आहेत ''[१३] ''राजतगड'' हे नाव औरंगाबादचे आहे''[१४] अशाप्रकारे औरंगाबाद शहर विविध नावांनी परिचित आहे.

मुघलांच्या अधिपत्याखाली खडकी शहर :
''मुघलांच्या सत्तेतील दख्खनमधुन नेमवुन दिलेला पहिला राजपुत्र औरंगजेबची नेमणुक १४ जुलै १६३६ रोजी झाली होती.''[१५] ''त्या अगोदरच निझामशहाचा वझीर मलिक अंबरने खडकी शहराचे चांगल्या पद्धतीने विकसीत करुन सामाजिकीकरण केले होते. त्या शहराला त्याने आपल्या नावाखाली अधिक प्रगत केले.''[१६] मुघलांची दक्षिणेतील राजधानी ही दौलताबाद (देवगिरी) ही होती. जेव्हा औरंगजेब बादशहा दौलताबादहुन औरंगाबादला-खडकी शहरात आला. आणि तो २८ मे १६४४ पर्यंत औरंगाबादला राहिला. हे नवीन शहर औरंगाबाद, त्यावेळी दक्षिणसुभाचे प्रमुख शहर म्हणून प्रसिद्ध झाले. ''औरंगजेबाने मोठ्या इमारती, विशेष गार्डन, सुंदर रस्ते, बाजार मोठ्या प्रमाणावर विकसीत केले. त्याने शहराच्या विकासाकडे अधिक लक्ष दिले. शहराच्या चहुबाजुंनी इ.स. १६८२ मध्ये तटबंदी तयार करण्यात आली''[१७] त्यामुळे शत्रु तथा हिंस्त्र प्राण्यापासुन शहराचे संरक्षण होत गेले. त्यामुळेच औरंगाबाद हे शहर मजबुत शहर म्हणुन पुढे आले. इ.स. १६०७ ते १६०८ मध्ये खडकीची निजामशाहीची सैनिकी छावणीसाठी निवड करण्यात आली.''[१८] त्यातूनच ''पुढे इ.स. १६१२ मध्ये सुनियोजित शहर म्हणून त्याची स्थापना करण्यात आली''[१९]

मलिक अंबरच्या काळात या शहराचे नाव खडकी होते. पुढे त्याचा मुलगा फत्तेहखान याच्यावरुन शहराचे नाव 'फत्तेहनगर' म्हणून संबोधले गेले. तर मुघल काळाचा विचार करता असफजाहीने या शहरास 'खुजिस्त बुनियाद' म्हणून संबोधले. मात्र औरंगजेबाच्या कारकिर्दीवरुन

या शहराचे नाव 'औरंगाबाद' असे संबोधण्यात आले. औरंगाबाद या शहरात औरंगजेब यांची बरीचशी कारकीर्द गेली. शेवटी इ.स. १७०७ मध्ये त्याचा मृत्यु झाला व त्याची कबर खुलताबाद येथे तयार करण्यात आली.

पुढील काळात रघुनाथराव पेशवा आपले सैनिक फौजा घेऊन शहराच्या उत्तरेकडे तटबंदीच्या (Fort wall) च्या पायथ्याशी आला आणि त्याने हत्तीच्या साहाय्याने प्रवेशद्वारावर (Gates) जोर लावण्याचा प्रयत्न केला. जे दरवाजे आतुन बंद करण्यात आले होते, किले अर्क येथील मोठ्या गार्डनच्या दरवाजाला ढकलण्याचा प्रयत्न केला होता. त्यावरुन तटबंदी व प्रवेशद्वारांचे महत्त्व लक्षात येते. त्यावेळी मुघल शहानवाज औरंगाबादला होता.

"झेबुन्निसा ही औरंगजेबाची कन्या, तिच्या नावानेच किले अर्क परिसरात वास्तु बांधण्यात आली. नौबत दरवाजाच्या समोर ही मोठी वास्तु आहे."[२०] मुघल सम्राट औरंगजेब याने इ.स. १६९२ मध्ये किलेअर्क परिसरात वास्तु बांधली. असा उल्लेख औरंगाबाद गॅझेटमध्ये आलेला आहे. या ऐतिहासिक वास्तुचा परिसर मक्काईगेट ते दिल्लीगेटपर्यंत होता. किले अर्कला एकुण ५ प्रवेशद्वार तटबंदीसह होती.

खडकी विकास : पूर्वीचे खडकी किंवा आजचे औरंगाबाद शहराचे वैशिष्ट्य म्हणजे भव्य प्रवेशद्वार, मजबूत तटबंदी आणि उपतटबंद्या हे होय. त्यामुळेच ते ऐतिहासिक शहर पर्यटकांच्या आकर्षणाचे आज केंद्र बनले आहे. औरंगाबाद शहर विकासात, ऐतिहासिक दृष्टीकोनातून अरब राष्ट्राकडून तसेच इजिप्त, उत्तर आफ्रिका, चिली, स्पेन, जेरुसलेम इत्यादी राष्ट्राकडुन वास्तुंची मांडणी केलेली आहे हे स्पष्ट होते.

बगदाद हे जगविख्यात शहर चार वर्षात जवळपास १०,००,००० कारागिरांच्या साह्याने बनवलेले एक सुनियोजित शहर आहे. ह्या शहराला चहुबाजुंनी तटबंदी (Fort wall) आहे. मांडणी पुरातत्त्वाच्या साहय्याने योग्य केली आहे हे दिसून येते. त्याच धर्तीवर औरंगाबाद ह्या शहराला देखील तटबंदी व प्रवेशद्वार यांची उत्कृष्टरित्या बांधणी केलेली दिसून येते.

"जेव्हा मलिक अंबरने निझामशाहीची राजधानी खडकी येथे आणली. त्यावेळी खडकी हे शहर पुर्वेला व काही उत्तरेला होते. ज्या ठिकाणी लोकसंख्या कमी होती, तेथे अंबरने ती वाढविण्यासाठी प्रयत्न केले. ती ठिकाणे वाढवली, विकसीत केली"[२१] "काली मस्जिद बेगमपुरा येथे निर्माण केली."[२२] तर औरंगजेबच्या काळात बेगमपुरा विकसीत करण्यात आला. "इ.स. १६३३ मध्ये बीरसिंगचा मुलगा डालिया नरेश राजा शुभाकर्ण याने पहाडसिंगपुरा, बेगमपुऱ्याजवळ विकसीत केला"[२३] त्यावरुन मलिक अंबरने शहर विकसित करण्याकडे विशेष लक्ष दिले.

राजतगढ संबंधात बेगमपुरा, तर खडकी संबंधीत औरंगाबाद हे प्रमाणित आहे. औरंगाबाद शहर प्राचीन काळातही सर्वांगिक दृष्ट्या समृद्ध असे होते. प्राचीन काळातीलच औरंगाबादची लेणी ही औरंगाबादचे ऐतिहासिक महत्त्व सांगते. शिवाय पितळखोरा, अजिंठा, वेरुळ, पैठण इ. ठिकाणे ह्याच शहराबरोबर विकसीत झालेले आहेत.

खडकी, राजतगड, खुदिस्त बुनियाद, फत्तेनगर, औरंगाबाद अशा नावांनी हे शहर ऐतिहासिक होत गेलेले आहे. निझामशाहीची एकवेळची राजधानी व मुघलांचे दख्खन देखील

महत्त्वपूर्ण प्रदेश म्हणून औरंगाबाद आहे.

मध्ययुगीन कालखंड (१३१८-१६८७)

महाराष्ट्राच्या इतिहासात मध्ययुगीन कालखंडाला अतिशय महत्त्व आहे. "देवगिरीच्या यादवांच्या साम्राज्याचा नाश झाल्यापासून म्हणजेच साधारणत: इ.स. १३१८ पासून मध्ययुगीन कालखंडाला सुरुवात झाली असे मानले जाते, तर साधारणत: इ.स. १३१८ पासून मध्ययुगीन कालखंडाला सुरुवात झाली असे मानले जाते, तर साधारणत: इ.स. १६८७ पर्यंत म्हणजेच औरंगजेबाने विजापूर व गोवळ्कोंडा ही राज्ये जिंकेपर्यंतचा काळ असे मध्ययुगीन कालखंडाचे वर्णन करावे लागेल"[२४] असे कुंटे भ. ग. यांच्या 'गुलशने इब्राहीमी' या पुस्तकात नमूद केले आहे.

मुगल कालखंडातील स्थापत्य आणि वास्तुशिल्पाचे फारच थोडे अवशेष महाराष्ट्रात शिल्लक आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे मुगलांचे महाराष्ट्रातील १७ वे शतक हे जवळजवळ युद्धाच्या धामधुमीतच गेले, याचा परिणाम असा झाला की, उत्तरेमध्ये याच कालखंडात अतिशय वैभवसंपन्न अशा कलाकृती, वास्तुंची निर्मिती झाली. तर दक्षिणेत याच अवधीत नाव घेण्याजोग्या अशा फारच थोड्या कलाकृती निर्माण झाल्या, "ज्याला मराठवाड्याचा मोहना असे संबोधिता येईल. अशा औरंगाबाद शहराची निर्मिती ही मुघलांच्या काळात झाली."[२५]

महाराष्ट्रातील मध्ययुगीन कालखंडात ऐतिहासिक राजधानीची अनेक शहरे होती. विविध सत्ता बदलत गेल्या होत्या. इ.स. १२९६ पर्यंत महारष्ट्राच्या यादवांची सत्ता ही प्रबळ व सामर्थ्यशाली होती. परंतु अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीनंतर हे यादवांचे राज्य संपुष्टात आले व खिलजी घराण्याची सत्ता अस्तित्वात आली. तेव्हापासून दक्षिणेकडील राजकारणात मुस्लिमांचा सत्ता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न होऊ लागले. खिलजी नंतर पुढे तुघलक घराण्याची सत्ता स्थापन झाली. पुढे "१४ व्या शतकात १३०७ मध्ये बहामनी राज्याची स्थापना दक्षिणेत झाली. काळाच्या ओघात या राज्याचे पाच तुकडे पडले व पाच स्वतंत्र शाहया (सत्ता-घराणे) अस्तित्वात आल्या. अहमदनगरची निजामशाही, विजापूरचवी आदिलशाही, बिदरचवी बरीदशाही, गोवळकोंड्याचवी कुतुबशाही, वराडची ईमादशाही"[२६] ही मुळ बहामनी राज्याचीच किंवा घराण्याचाच साम्राज्यविस्तार किंवा सत्ताविस्तार चा भाग असे म्हणता येईल.

ऐतिहासिक शहर म्हणुन जेव्हा औरंगाबादचा उल्लेख केला, तेव्हा या तीन महत्त्वाच्या कारकिर्दीत ह्या शहराची उभारणी झाली. त्यातील अहमदगरची निजामशाही म्हणजे मलिक अंबरचा काळ, त्यांनंतर मुघलकाळातील औरंगजेबाचा काळ व पुन्हा हैद्राबादच्या निजामशाहीचा असफजहाचा काळ. ह्या सर्व सत्तांच्या कारकिर्दीत काळ हा मध्ययुगीन कालखंडातील आहे. ह्या सर्वांचे योगदार "औरंगाबाद शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. या काळातील कारागिरी, कलाकृती, वास्तू ह्या मुस्लीम आणि हिंदू स्थापत्य कलाकारांनी तयार केलेल्या आहेत."[२७]

औरंगाबाद शहराविषयी सविस्तर माहिती डॉ. बर्डिले यांच्या 'Statistics of the City of Aurangabad' ह्या पुस्तकात दिलेली आहे. त्याचबरोबर सय्यद बिलग्रामी यांनी इ.स.१८८४ च्या औरंगाबाद गॅझेट मध्ये देखील दिलेली आहे. त्यानुसार औरंगाबादचा विस्तार हा उत्तर दक्षिणेकडे सातारा टेकडीपर्यंत झालेला आहे. हे शहर बेसॉल्टीक दगडी खडकावर असुन त्याचा वरचा थर मातीचा आहे. "फ्रेंच प्रवासी डॅव्हर्नॉट हे जव्हा सुरत ते औरंगाबाद ह्या दरम्यान प्रवास करत असतांना

ते औरंगाबाद येथे थांबले, त्यावेळी मुख्य शहराला तटबंदी नव्हती, असे त्यांनी प्रवास वर्णनात लिहिले आहे.[२८]

खुजिस्त बुनियाद औरंगाबाद : औरंगजेबाच्या दरबारात रोज जे घडले त्या विषयक नोंदी घेण्यासाठी तरतुद होती आणि संध्याकाळी बादशहाला ती नोंदणी पत्र किंवा बातमी पत्र दाखवायची अशी पद्धत होती. बादशाहने मान्यता दिल्यावरच ती दप्तरखाणत ठेवून घ्यायची ही देखील पद्धत होती. औरंगजेबाचा विश्वासू चिटणीस व पत्रलेख इनायतुल्लखान हा होता. बादशहाच्या आज्ञेवरून, आदेशावरून अनेक आदेश तथा पत्राचे लेखन त्याने केलेले आहे. ही पत्रे पारशी भाषेत आहेत. तया संदर्भात अधिकृत मुळ दस्ताऐवज, नकला जरपुरच्या राजदरबारात दप्तरखान्यात आहेत. त्यातील काही महत्त्वपूर्ण आदेशाचे लेखन सेतु माधव पगडी यांनी 'अहकामे आलमगिरी' ह्या पुस्तकात मराठी अनुवादित केलेले आहे. त्यातील पत्र क्र. ३५४ व मुळ हस्तलिखिताच पान क्र. १३२ च्या पत्रावरून औरंगाबाद ह्या शहराला 'खुजिस्त बुनियाद' म्हणून संबोधले जाते. त्यातील मजकूर साधारणतः असा आहे की, "बातम्यावरून कळते की, शहजादे बहादूर ते अकबरपूर व सरगोन बऱ्हाणपुरकडे परतत आहेत. अशा परिस्थितीत आपण जुल्फिकारखान येथुन बऱ्हाणपुरास जाणे व शहामत पुन्हा सर्कराज खानव यांचे खुजिस्त बुनियाद (औरंगाबाद) येथे जाणे हे निरर्थक होईल. आपण आपल्या ठिकाणी राहावे आणि शहजादे माळव्याला जातील आणि तुम्हाला बोलवतील तर त्यांच्याकडे जावे."[२९]

"औरंगजेब दरबारातील अनुवादीत आज्ञा पत्र क्र. १६१ व मुळ हस्तलिखित पान क्र. २५० नुसार औरंगाबादला इ.स.१७०७ मध्ये 'खुजिस्त बुनियाद' असे अमरसिंगाने एका विनंतीत संबोधलेले आहे."[१०] अशाप्रकारचे उल्लेख औरंगाबाद शहराबाबत आढळून येतो.

औरंगाबाद शहराचे शिल्पकार :

मलिक अंबर : औरंगाबाद या शहराची स्थापना, ज्यांनी रूप देणारा शुर सेनानी मलिक अंबर हा आहे. ह्या शहराला अतिशय सुंदर आणि सुविकसित बनवण्यात त्याचा मोठा वाटा आहे. "अलहुरा" या प्रदेशात मलिक अंबरचा जन्म झाला. घरची परिस्थिती खूप गरीबीची असल्याने त्याच्या वडिलाने त्याला एका काझीला विकले. काझीने त्याला चांगले शिक्षण दिले. अंबरचे मुळ नाव 'शाबु' किंवा 'शान बु''. काझीने त्यास चांगल्या प्रकारे शिक्षण देऊन त्याचे नाव अंबर ठेवले. निजामशाहीची राजधानी अहमदनगर येथील चेंगीजखानाने (ख्वाजा डबीर अशफानी) त्याला विकत घेतले. अशफानी यांनी अंबरला त्याच्या बुद्धीमत्तेमुळे, कौशल्यामुळे चांगली वागणुक दिली. अंबरला तांत्रिक कला अवगत असल्यामुळे, बुद्धीमत्तेमुळे, शिक्षणामुळे आणि त्याच्या नैसर्गिक युद्धनिती कौशल्यामुळे निजामशाहीत महत्वाचे स्थान होते. मात्र चेंगीजखानाच्या मृत्यूनंतर अंबर अस्थिर झाला आणि गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीस जाऊन मिळाला. परंतु तो तेथे समाधानी नव्हता."[११]

त्यामुळे पुढे तो विजापूरच्या सैनिक दलास जाऊन मिळाला. त्याच्या बुद्धिमतेच्या व अनुभवाच्या जोरावर सुलतानाने त्याला 'मलिक' संबोधले. विजापूरमध्ये तो मिळणाऱ्या पगारावर समाधानी नव्हता. जेव्हा निजामशाहीची राजधानी अहमदनगर ही अकबराच्या अधिपत्याखाली जात होती, त्याच काळात निजामशहाने मलिक अंबरला बोलवणी पाठवली आणि तो निजामशाहीत नोकरी करू लागला.

इ.स. १६०० मध्ये निजामशाहीतील घडामोडी बिघडत असताना दक्षिणेत मोघालांनी ठाम मांडले. त्यावेळी "निजामशाहीचा इब्राहीमने विजापुरच्या नवरसपुर नावचे नवीन शहर उभारण्याचे काम हाती घेतले होते. त्याचे संपुर्ण लक्ष त्या उभारणीकडेच होते. निजामशाहीची

दुर्दशा होत चालली होती. मुगलांचा ताबा बसत होता. अशा बिकट परिस्थितीत मलिक अंबर नावाच्या एका कर्तबगार माणसाने निजामशाही पुन्हा उभी करण्याचा प्रयत्न केला."[३२] "मलिक अंबर मुळाचा इथिओपियातला एक अनाथ होता. दारिद्रीपणामुळे तो बगदाद मध्ये गुलाम म्हणून विकला गेला. पुढे अहमदनगरला मुर्तजा निजामशहाच्या मुख्य प्रधानास त्याची गुलाम म्हणून पुन्हा विक्री झाली."[३३] त्यांच्या अंगी असलेल्या गुणांना काही प्रमाणात निजामशाहीत वाव मिळाल्यामुळे त्याने लष्करी व मुलकी कारभारसंदर्भात अशा लहानमोठ्या नोकऱ्या केल्या.

"दि. ३ जुलै १६०० चांद बिबीचा खुन झाल्यावर आणि बहादुर पदभ्रष्ट होऊन मुगलांचा कैदी झाल्यावर निजामशाहीची अहमदनगर येथे सत्ता संपली असेच बहुतेक सर्वांना वाटु लागले होते; पण मलिक अंबर तसे मानण्यास तयार नव्हता."[३४] त्याने मुगलांचे आव्हान स्वीकारून त्यांना दक्षिणेतुन हाकलून लावण्यासाठी कंबर कसली होती आणि मलिक अंबरने दिवसेंदिवस आपली दक्षिणेत सत्ता वाढवून निजामशाही सत्ता पुढे आणण्याचा प्रयत्न केले.

मलिक अंबरने राजधान्या बदलल्या :

"निजामशाहीच्या घराण्यातलाच एक युवक दुसरा मुर्तजा खान यास परांडा येथे मलिक अंबरेने तख्तवर बसविले. सैन्याची जमवाजमव करून, जेथे मुगलांचा बंदोबस्त पुरेसा नव्हता, ती ठाणी, ते ठिकाण मलिक अंबर परत घेऊ लागला. मुगलही त्याला प्रतिहार करत होते. मलिक अंबरला सतत धावपळ करवी लागत होती."[३५] निजामशाह व मलिक अंबर यांना मुघल सैनिक सळो की पळो करत होते. त्यामुळे त्यांना कधी परंडा, जुन्नर, दौलताबादपासुन १३ कि.मी. अंतरावर असलेल्या खडकीची मलिक अंबरने राजधानी म्हणून निवड केली."[३६] त्यातुनच "पुढे औरंगावादला राजधानीचे स्वरुप सर्वप्रथम निजामशाहीत मलिक अंबरने दिले."[३७] अहमदनगरच्या निजामशाहीच राणी चांदबिबी हिच्या विरूद्ध मुघल अकबराने सैनिक पाठवून तिचा वध घडवून आणला. "१ ऑगस्ट १६०० रोजी अहमदनगरचा किल्ला व शहरावर मुगल अंमल बसवण्यात आला. पूर्वी इ.स. १५८६ व १५८९ मध्येही अहमदनगरच्या निजामशाहीविरूद्ध आक्रमणे झाली होती. मात्र दोन्ही वेळा मुगल अकबर सेनेला यश आले नव्हते."[३८] मलिक अंबर हा कलाप्रेमी होता. वास्तुशिल्पकला त्याला आवडत व समजत होती. औरंगाबाद हे मलिक अंबरच्या कलविश्वातील एक भेट व निर्मिती आहे. मलिक अंबरने दौलताबावर विजय मिळवून 'खडकी'ला सैनिकी छावणी करण्याचे ठरविले. खडकी हे एक छोटे खेडे होते, जेथील परिसर नैसर्गिक खडकाळ व दगडाचा होता. अंबरने जहांगीर विरूद्ध विजय मिळवल्यामुळे खडंकी सैनिक छावणी येथे एक विजयाचे प्रतिक म्हणून या खडकी शहराला संबोधले जाते. "पुढे त्याच्या मुलाच्या नावावरून खडकीलाच 'फत्तेनगर' किंवा 'फत्तेहबाद' संबोधले जाऊ लागले." [३९]

"इ.स. १६२१ मध्ये मलिक अंबरचा मुलगा फत्तेहखान याने मुगलांविरूद्ध विजय मिळवला. त्याच्याच नावावरूनच इ.स. १६२८ मध्ये खडकी शहराचे नाव फत्तेहनगर ठेवण्यात आले."[४०] "फत्तेखान हा मलिक अंबरचा मुलगा यांनी निजामशाहीची धुरा सांभाळत १७ जुन १६३३ रोजी दौलताबाद काबीज केले. काही काळ दौलताबाद ही देखील निजामशाहीची राजधानी होती." [४१] "मलिक अंबर निजामशाहीसाठी खूप झटला होता; पण मुगलांनी आपला ताबा बसवुन निजामशाही खिळखिळ केली होती. त्यामुळे निजामशाहीची राजधानी अहमदनगर ही कायम धोक्यात असल्यासारखी त्याला जाणवत असे."[४२] "दौलताबाद पासुन काही अंतरावर असलेला खडकाळ परिसर, जेथे मलिक अंबरने सैनिक छावणी निर्माण केली. त्यालाच खडकी म्हणून संबोधले जाते." [४३] शहारामध्ये

खडकी हे मलिक अंबरने निजामशाहीची राजधानी म्हणून निवडले होते. त्याने या शहरामध्ये सर्व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून पाण्याच्या मुळ प्रश्नांचा विचार करून ग्रीन बंगलो, रॉयल मार्केट (बाजार), शहागंज हे निर्माण केलेच. शिवाय "इ.स.१६१६ मध्ये त्याने नवखंडा पॅलेस, मजिद अशा अनेक वास्तु तयार केल्या."[४४]

मलिक अंबरने खडकी शहराला अतिशय सुंदर वास्तुचे स्वरूप दिले. मलिक अंबरने या शहराला दिलेले योगदान म्हणजे 'नहर' होय. शहराला पाणीपुरवठा व्हावा म्हणून जी पद्धत सुरू केली तिला 'नहर' असे म्हणतात. दुर अंतरावरून जमिनीखालुन पाणीपुरवठा ह्या नहरीद्वारे शहराला होत होता, ती नहर मलिक अंबरने १५ महिन्यात पुर्ण केली. तिच्या बांधकामाचा खर्च साधारणतः अडीच लाखापर्यंत झाला होता. पुढे जेव्हा मुगल शहाजानने खडकी जिंकले, तेव्हा मलिकम अंबरने खडकीला जे रूप दिले होते, ते नष्ट करून किंवा त्यामध्ये फेरबदल करून नवीन शहराची निम्रित करण्याचे ठरविले होते. "इ.स.१६२६ मध्ये मलिक अंबर वयाच्या ८० व्या वर्षी अमरापूर, जि.अहमदनगर येथे मरण पावला. नवखंडा पॅलेस औरंगाबाद येथे त्याला दफन करण्यात आले. नवखंडा हे त्याचे विश्राम करण्याचे ठिकाण होते."[४५]

सम्राट औरंगजेब : "पहिला आलमगीर म्हणून दिल्लीच्या तख्तावर बसलेला मोहिउद्दीन मोहम्मद औरंगजेब हाम मुमताजमहल आणि शहाजहान यांचा ६ वा मुलगा होता. त्याचा जन्म १५ जिगदा १०२० अे.एच. (२४ ऑक्टोबर १६१८) या तारखेला रात्री दोहर या ठिकाणी झाला. दोहर हा मुंबई प्रांतात पंचमहाल जिल्ह्यातील एक उपविभाग आहे. औरंगजेब १० व्या वर्षी असताना गिलान येथील मिर मोहम्मद हाशिम यांची शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली." [४६] मुल्ला सालेम हे ही औरंगजेबाचे शिक्षक होते.

औरंगजेबाचा नातु बिदर बक्ष लिहितो, "त्या काळात मी दौलताबाद आणि औरंगाबाद येथे राहत होतो, तेव्हा एक छोटे शहर म्हणून औरंगाबाद नावारूपास येते होते. लोकसंख्या वाढत होती. त्या शहराला मलिक अंबरने वसवले असताना शहराचे नाव 'खडकी' होते. औरंगाबादपासुन सातारा टेकडीपर्यंत मी घोडेस्वारी शिकलो."[४७] सातारा टेकडी ही औरंगाबादपासुन ६ मैल अंतरावर दक्षिणेकडे आहे. "औरंगजेबाला मोगल शासनात पहिली नेमणूक १३ डिसेंबर १६३४ रोजी मिळाली." [४८] त्याला १० हजार स्वाऱ्यांच्या सेनापतीचा दर्जा देण्यात आला.

"कंदाहारपासुन काबुलला परत आल्यानंतर त्याची दख्खनचा सुभेदार म्हणून इ.स.१६५२ मध्ये दुसऱ्यांदा नेमणुक करण्यात आली. दक्षिणेकडे येताना बऱ्हाणपुर येथे ९ महिने त्याने मुक्काम केला. नोव्हेंबर १६५२ मध्ये औरंगजेब औरंगाबादला येऊन पोहचला. तेथे त्यांनी आपल्या आयुष्याची ४ वर्षे घालवली. ह्या ४ वर्षात गोवळकोंडा व विजापूर या दोनच ठिकाणी स्वाऱ्या करण्यासाठी त्याने औरंगाबाद शहराबाहेर प्रयाण केले."[४९] आणि अखेरीस दिल्ली तख्त बळकावण्यासाठी ५ फेब्रुवारी १६५८ रोजी औरंगाबाद हे कायमचे सोडले.

इ.स. १६४४ च्या मे महिन्यात औरंगजेबाने दख्खनची सुभेदारी सोडली. तेव्हापासुन मुगल राजवटीत फारसा उत्कर्ष झाला नाही. तशी ह्या प्रदेशात शांतता होती. हा प्रदेश पुष्कळसा लागवडीच्या शेतजमिनीचा असूनही पिडित जमिनी ठेवल्यामुळे जंगलाचा बनला होता. महसुलाचे प्रमाणे खूप खालवले होते. सुभेदारांच्या वारंवार होणाऱ्या बदल्या, कर्तव्यशुन्य सुभेदार यामुळे औरंगबाद दक्षिणेकडील सुभ्याची परिस्थिती निकृष्ट दर्जाची झाली होती. हा सुभा मोठा असुनदेखील एकसंघ नव्हता. येथील प्रदेशांचे संरक्षण करण्यासाठी मोठे सैन्य ठेवावे लागत असे. त्यावर खर्चही जास्त असूनही शेतसारा वसुल होत नव्हता. "दक्षिणेकडील ह्या मुगल सुभ्यात ४ परगणे होते. त्यांचे एकुण वार्षिक उत्पन्न ३ कोटी ६२

लाख होते; पण १६५२ मध्ये प्रत्यक्ष वसुली मात्र फक्त १ कोटीची म्हणजे उत्पन्नाच्या १/३ पेक्षाही कमी झालेली होती."[५०] उत्पन्नापेक्षा खर्चच जास्त. त्यामुळे इतर संपन्न सुभ्यातुन ह्या सुभ्याचा राज्यकारभार चालवावा लागत असे. त्यामुळे शहाजहानने दक्षिण सुभेदार म्हणुन औरंगजेबाची पुन्हा दुसऱ्यांदा येथे नेमणुक केली.

"मुगल बादशहा शहाजहानने औरंगजेबाला इ.स.१६३६ मध्ये दक्षिणेकडे लक्ष ठेवण्यासाठी पाठवले. इ.स. १६३६ ते १६४४ या काळात औरंगजेब दक्षिणमध्ये राहिला. मात्र त्याने कोणत्याच हालचाली केल्या नाहीत. म्हणून त्यास पुन्हा दिल्लीस बोलवण्यात आले होते."[५१] इ.स. १६५३ साली औरंगजेबाकडे दख्खनची सुभेदारीची सत्ता हाती आली. त्यावेळी "औरंगाबाद शहराचा अनेकवेळा 'खुजिस्त बुनियाद' असा संबोध केलेला आढळून येतो."[५२] "इ.स. १६३३ मध्ये औरंगजेबाने हे शहर ताब्यात घेतले. त्यानंतर त्याचा विस्तार करून त्याचे नाव "औरंगाबाद' संबोधले गेले."[५३] "औरंगजेबाचा इतिहास हा हिंदूस्थानाचा जवळ जवळ ६० वर्षाचा इतिहास आहे."[५४] त्याच्या स्वतःच्या कारकिर्दीमध्ये १७ व्या शतकाचा उत्तरार्धाचा अंतरभाव होतो. ही कारकीर्द साधारण इ.स.१६५८ ते १७०७ अशी आहे.

"औरंगजेबास चित्रकला, संगीत वास्तुशिल्पकलेची फारशी आवड नव्हती. त्याच्या कारकीर्दीमध्ये वास्तुकलेचा एखादा सुंदर नमुना, मजिद किंवा कबर अशा वास्तु कमी प्रमाणात आढळून येतात. मोठ्या स्वरुपात अपवाद म्हणजे फक्त दिल्लीच्या राजवाड्यातील मोठी मजिद ही होय. या मजिदीचे बांधकाम १० डिसेंबर १६५९ रोजी सुरू केले आणि ५ वर्षात ही मजिद बांधून घेतली गेली. मजिदीचा एकुण खर्च १ लाख ६० हजार रु. (ए.एन.४६९) आला. औरंगाबाद येथे त्याने आपली पत्नी दिलराजबानू हिची कबर बांधली. त्याने बांधलेल्या सर्व वास्तुमधील सर्वात भव्य अशी वास्तु ही त्याच्या पत्नीची 'बिबी-का-मकबरा'ही होती."[५५] शिवाय विजयाचे देखावे चित्रीत करणाऱ्या मजिदी, असंख्य धर्मशाळा असे सर्वसाधारण बांधकाम औरंगजेबाने केलेले आढळून येते.

साधारणपणे सांस्कृतिक बाबींना जो राजश्रय मिळतो, तो या मुगल काळात मिळाला नाही. कलाकृतीच्या जोपासनेची अपेक्षा झाली. बऱ्याच अंशी औरंगजेबाचे व्यक्तिमत्वही कारणीभुत होते. कलेचा हा जो ऱ्हास झाला, त्याला तात्कालीन परिस्थितीही कारणीभुत होती. "मुगल साम्राज्याने आपल्या वैभवाची परिसिमा शहाजहानच्या काळात गाठलेली दिसुन येते. कलेचाही फार मोठा विकास त्या काळात दिसुन येतो. वास्तु संदर्भात ही प्रगती औरंगजेबाच्या काळात रोखली गेली."[५६] या घटनेचा परिणाम असा झाला की, कला आणि शिल्प यांची प्रगती रोखली गेली. शिल्प कसे असावे याबाबत औरंगजेबाच्या कारकिर्दीत अस्तित्वात असलेलया बदलत्या दृष्टिकोनाचे प्रात्यक्षिक आपल्याला त्याच्या दक्षिणेत झालेल्या कलाकृतीवरून दिसून येते. त्यामध्ये बिबी-का-मकबरा ह्या वास्तुचे बांधकाम इतर वास्तुच्या मानाने चांगले झालेले आढळून येते. मात्र मुगलकालीन अनेक वास्तू खुप दर्जेदार आहेत हेही दिसुन येते.

"मुगलशाहीचा साम्राज्य विस्तार करत दख्खनकडे औरंगजेबाने आपल्या आयुष्यातील २५ वर्षे कार्यकाल औरंगाबाद या प्रदेशात घालवला."[५७] इ.स. १६९८ मध्ये जिंजीचा किल्ल मुगलांच्या हाती पडला. तोपर्यंत औरंगजेबाला कर्नाटकातुन निघुन सोलापुर जिल्ह्यात यावे लागले होते. त्यावेळी मराठ्यांचे बळ वाढलेले होते. राजाराम आणि ताराबाई यांच्या प्रतिहारामुळे औरंगजेबाला मराठ्यांनी जिंकून घेतलेले किल्ले परत मिळवण्यासाठी पुढची ८ ते ९ वर्षे जीवाची आटापिटा करावी लागली. अखेर त्यातच "औरंगजेबचा २० फेब्रुवारी १७०७ रोजी मृत्यू झाला."[५८] "औरंगजेब मुगलानंतर सत्ता इ.स. १७२० मध्ये निझामशाहीच्या

असफजहाकडे आली. नंतर असफजहाने इ.स. १७२४ मध्ये ही राजधानी परत करण्याबाबत विचार केला."५१ त्यानंतर निजामशाहीची ही राजधानी औरंगाबादहुन हैद्राबादला गेली.

औरंगाबादचा इतिहास पाहता येथे यादव, खिलजी, बहमनी, मुघल व निझामशाहीच्या असफजाही सत्तांचा कार्यकाळ येथे गेलेला आहे. येथे बिबीका मकबरा, पानचक्की, मशिदी अनेक दिव्य भव्य दरवाजे, तटबंदी, काला चबुतरा, काली मशिद, किले अर्क, हिमायत बाग, सुभेदारी नवखंडा पॅलेस, दगडी महल, गुलशन महल इत्यादींची निर्मिती आहे. त्याचबरोबर ५२ दरवाजे व ५२ पुरे म्हणून ओळखले जाणारे हे शहर आहे. आज ह्या शहरात दळणवळणाच्या सर्व सेवा सुविधा मोठ्या प्रमाणात असून हे औद्योगित केंद्र आहे. अशा ऐतिहासिक औरंगाबाद शहराचा अभ्यास व त्या संदर्भात संशोधन हे निश्चितच सर्वांसाठ महत्त्वपुर्ण ठरले.

संदर्भ सुची

01. Kunte.B.J.District Gazzette of Aurangabad, Govt. of Mah., Bombay, 2nd Ed., 1977,Pg.No. 937
2. Shaikh Ramzan, Medieval Aurangabad - A cultural study, Dr. Babasahab Ambedkar Marathawada University, Aurangabad, 1982.
3. Ibid
4. Mahanubhav Literature, Lilla Charitra, Vol. IIPg.No.202-206
5. Bendra W.S., Vijaypurchi Adilshahi, (Trans. of Busatin-us-Salatin) Bombay Itihas Sasodhan Mandal, 1968, Pg.No.272
6. Beveridge Henry, The Tuzak-Jahangiri, Vol.II Delhi, Oriental Publisher 1968,Pg.No.153-155.
7. Teland B.R., Aurangabad Ki Hindi Santwani, Alhabad, Ramnarayanlal Beni Prasad, 1967, Pg. No.7
8. Unpublished persion Man script Report to Nahar, 1861 AD. Doc.No.101. Appendix A.
9. Dadnya Shayam. Life and Time of Malik Ambalar, Delhi. Oriental Published and book sellers. 1968.Pg.No.158.
10. Sarkar Jadunath, House of Shivaji, 3rd edition, Calcutta, M.C.Sarkar and Son 1955,Pg.No.17
11. Beveridge Henry, Op.Cit.,Pg.No.417.
12. Thosar H.S., Studies in the Historical and cultural Geography of Maharashtra, 1977,Pg.No.937
13. British Museum, Plates of Charudevi. Eplgraphic , India, Vol.III Pg.No.143-146
14. Deshpande N.M. Ancient India, Pg.No. 16
15. Sarkar Jadhunath, History of Aurangzeb, Vo.I&II, New Delhi, Orient Longman,1973 Pg.No.19.
16. Deshpanade N.M.Op.Cit., Pg.No.16
17. काटे पं.व्यं.देशपांडे प्र.न., मराठवाडा विद्यापीठ पत्रिका, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, खंड-९नं.१, जुलै १९६९, पृष्ठ क्र.३१
18. Beveridge Henry, Op.Cit.,Page No.314.
19. Tamaskar B.K., The life and work of Malik Ambar, Causiganj Street, Delhi.
20. Kunte B.G., Op.Cit., Pg.No.946.
21. Sexna Bhimsen, Tarikh-e-Dilkasha.

(Trans.Jadunath S.ed.U.G Khobalkar), Bombay, Director of Archieves and Archology, Govt. of Maharashtra, 1972,Pg.No.8.

22. Map of Aurangabad Phase-2, Appendex CNo. 4 Pg. No.70
23. Khan Shahanawaz, Maseral-Umara, Vol.II,Pg.No.472, also see Telang B.R.,A'bad Hind Santwani, Allahabad Ramnarayan Beniprasab, 1967, Pg. No. 10
24. कुंटे भ.भ. गुलशने इब्राहिमी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, मे १९८२,मुंबई पृष्ठ क्र. १७
25. कित्ता, पृष्ठ क्र.४३
26. सावंत बी.बी. साळुंके टी.डी. ऐतिहासिक कागदपत्रे व स्थळे मेहता पब्लिशिंग १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०, १९९२, पृष्ठ.११९
27. Dulari Gupte Qureshi, Tourism potential in Aurangabad, Bhartiya kala Prakashan, Delhi, Pg.No.34
28. Ibid, Pg.No.32
29. सेतु माधवराव पगडी, अहकामे आलमगिर, परपुरे प्रकाशन मंदिर, मंदिर, गिरगाव, मुंबई-४, सप्टेंबर १९९३, पृष्ठ.क्र.७
30. कित्ता, पृष्ठ.कृ.६८
31. Dulari Gupte Qureshi, Op.cit Pg. No.5
32. आठवले सदाशिव, जगदगुरू इब्राहीम आदिलशहा, श्री.विद्या प्रकाशन, २५०, शनिवार, पुणे-३०, २६ जानेवारी १९९७, पृष्ठ.क्र.८०
33. कित्ता, पृष्ठ.कृ.६८
34. ओक पुरुषोत्तम नागेश, अकबर थोर नव्हताच, मनोरमा प्रकाशन, १२०/सी, माधववाडी, दादर, मुंबई-१४, १९९१,पृष्ठ.क्र. ६६
35. आठवले सदाशिव, उपरोक्त, पृष्ठ.क्र.८१.
36. Tamaskar B.K., Op.Cit.,Pg.No.334
37. Sarkar Jadunath, Op.Cit., Pg.No.97
38. ओक पुरुषोत्तम नागेश, उपरोक्त, पृष्ठ,क्र. ६६
39. Dulari Gupte Qureshi, Op.Cit.Pg.No.5
40. Seely John B., "Wonder of Ellora", 1820 II^nd Ed., Pg.No.No.367-369,403
41. Sarkar Jadunath, Op.Cit.,Pg.No.18
42. आठवले सदाशिव, उपरोक्त, पृष्ठ.क्र.८५-८७
43. Sarkar Jadunath, History of Aurangzeb, Op.Cit.,Pg.No.23
44. Ibid, Pg.No.95-96
45. Kunte B.G. Op.Cit.Pg.No.937
46. सरकार जदुनाथ, औरंगजेबाचा संक्षिप्त इतिहास, श्री.मंगेश प्रकशन, रामदास पेठ, नागपूर, १९९९, पृष्ठ.क्र. ६
47. Sarkar Jadunath, History of Aurangzeb, Op.Cit.,Pg.No.95
48. सरकार जदुनाथ, उपरोक्त, पृष्ठ क्र.८
49. कित्ता, पृष्ठ क्र.२०
50. कित्ता, पृष्ठ क्र.२१
51. Dulari Gupte Qureshi, Op.Cit.Pg.No.7
52. Kunte B.G., Op.Cit.Pg.No.937
53. Tamaskar B.K., Op.Cit.Pg.No.354
54. सरकार जदुनाथ, उपरोक्त, पृष्ठ क्र.१
55. कित्ता, पृष्ठ क्र.७
56. कुंटे भ.भ. उपरोक्त, पृष्ठ क्र. ४४
57. Dulari Gupte Qureshi, Op.Cit.Pg.No. 82
58. पगडी सेतु माधवराव, महाराष्ट्र-कर्नाटकातील सुवर्णकाळ, परपुरे प्रकाशन मंदिर, गिरगाव, मुंबई४, १९९०, पृष्ठ क्र. १११
59. काळे वाय.एम. वर्ध्याचा इतिहास, १९२४ पृ.क्र.१५१

❑❑❑